# सभोवतालच्या चौकडीचे
# अण्णांवर दडपण

**नवी दिल्ली** | दि. २१
(विशेष प्रतिनिधी)

**ज्येष्ठ** समाजसेवक अण्णा हजारे यांचे मौनव्रत हे शरीरस्वास्थ्यासाठी असले तरी हरियाणातील हिस्सारच्या पोटनिवडणुकीत 'चांडाळ चौकडी'सोबत अण्णांना सहभागी व्हायचे नव्हते, हे त्यामागे प्रमुख कारण होते, असा दावा अण्णांच्या मौनाच्या काळात त्यांचा ब्लॉग लिहिणारे राजू परुळेकर यांनी केला आहे.



येथील गांधी पीस फाऊंडेशनच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना परुळेकर यांनी टीम अण्णामधील सदस्य अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनिष सिसोदिया यांना चांडाळ चौकडी असे संबोधले.

टीममधील हे चारही सदस्य अण्णांचा वापर करून घेत आहेत. त्यांना अण्णांबाबत थोडीसुद्धा आस्था नाही. फक्त अण्णांना ढाल म्हणून वापरण्याचे कौशल्य त्यांच्यात असल्याची टीकाही केली. अण्णा राळेगणसिद्धीत एक बोलतात आणि दिल्लीत या चांडाळ चौकडीच्या गराड्यात आले की त्यांचे वक्तव्य वेगळे असते. अण्णा कोणापुढेही न नमणारे, दिल्लीत मात्र दडपणात असतात असा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, अण्णांचा ब्लॉग प्रसिद्ध होणे ही बाब अण्णांच्या टीमला पसंत नव्हती. प्रशांत भूषण यांनी, 'अण्णांकडून तुम्ही वदवून घेता' अशी टीका माझ्यावर केली.



> **टीममधील हे चारही सदस्य अण्णांचा वापर करून घेत आहेत. त्यांना अण्णांबाबत थोडीसुद्धा आस्था नाही. फक्त अण्णांना ढाल म्हणून वापरण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे.**
>
> \- राजू परुळेकर

अण्णांच्या आंदोलनाच्या माध्यमातून जमा झालेला पैसा तसेच अण्णांनी पैसे घेऊ नका, असे आदेश आर्गस्टमध्येच दिले असताना अलिकडच्या काळापर्यंत पैसे गोळा कसे झालेत आणि रामलीला मैदानावरील आंदोलन काळात झालेल्या खर्चाबाबतचे प्रश्न उपस्थित करत या चारही सदस्यांना आरोपीच्या पिंज-यात उभे केले. मी हे आंदोलन उभारले नसते तर या लोकांची (चौकडीची) काय किंमत असती, असा प्रश्न स्वतः अण्णांनी माझ्याकडे केला असल्याचा दावाही परुळेकर यांनी केला.